महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, वर्धा, चंद्रपूर व भंडारा या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय सीटीई-०७२२/प्र.क्र.७५(१)/पोल-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० जून,२०२३.

वाचा:-

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. असंक-१००१/प्र.क्र.२१/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०/०९/२००१.
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/विसु-१, दि. ११/०२/२०१६.
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आपुकक्ष, दि. २५/०५/२०१७.
४. ~~वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि. ०९/०६/२०१७.~~
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि. २९/०६/२०१७.
६. गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दि. २५/०२/२०२२.
७. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आपुक, दि.२७/०४/२०२२.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/४४/मनुष्यबळ-आकृतीबंध /२६-ब/१२-अ/२०१४/२१०, दि.१८/०७/२०२२.
९. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१३/१२/२०२२ रोजीचे सन २०२२ मधील ०५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ५ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयाव्दारे सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांच्या आढाव्यांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी गठीत अ.मु.स (सेवा)/साप्रवि व प्र.स (व्यय) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उपसमिती व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने सुधारीत आकृतीबंध निश्चित करणेबाबतचे निर्देश दिलेले होते.

२. उक्त संदर्भ क्र.६ येथील गृह विभाग, शासन निर्णय, दि.२५/०२/२०२२ व्दारे पोलीस घटकांतील पोलीस नाईक हा संवर्ग रद्द करुन, या संवर्गातील पदे सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस शिपाई या पदांत वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आवश्यक ते बदल करुन सुधारीत पदांची माहिती या पोलीस घटक कार्यालयाच्या आकृतीबंध प्रस्तावामध्ये दर्शविण्यात आली आहे.

३. त्या अनुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, वर्धा, चंद्रपूर व भंडारा या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारीत आकृतींबध प्रस्ताव मंजूरीकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय क्र.८ येथील दि.१८/०७/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे शासनास सादर करण्यात आला होता.

४. त्या अनुसार उक्त संदर्भ क्र.९ येथील मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या सन २०२२ मधील ५ व्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, वर्धा, चंद्रपूर व भंडारा या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित व बाह्ययंत्रणेव्दारे घ्यावयाचे मनुष्यबळ सेवा अशा सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आली.

शासन निर्णय :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय क्र.८ येथील पत्राव्दारे सादर केलेल्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, वर्धा, चंद्रपूर व भंडारा या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव हे नवीन पदनिर्मिती / पदांचे पुनरुज्जिवन व पदांचे आढावे इ. प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समिती समोर प्रस्ताव सादर केला होता.

२. सदरहू उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.१३/१२/२०२२ रोजीचे सन २०२२'मधील ५ व्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक,नागपूर ग्रामीण,वर्धा,चंद्रपूर व भंडारा या पोलीस घटक कार्यालयांच्या आस्थापनेवरील घटकनिहाय एकूण नियमित ९,२८१ पदे व बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाच्या एकूण १२५ सेवा अशा सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे.

३. सुधारीत आकृतीबंधानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण,वर्धा,चंद्रपूर व भंडारा या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित पदांची, तसेच बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाची माहिती (पदनाम, वेतन श्रेणी, मंजूर पदे) परिशिष्ट- अ,ब,क,ड,इ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सोबत जोडण्यात आली आहे.

४. महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, वर्धा,चंद्रपूर व भंडारा या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचे सुधारीत आकृतीबंधास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाच्या सोबतच्या परिशिष्टामध्ये दर्शविलेल्या मनुष्यबळ संख्येच्या मर्यादित सेवा आवश्यकतेनुसार बाह्य यंत्रणेव्दारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, त्या संबंधित संवर्गात सध्या अधिसंख्य म्हणून पदे कार्यरत असल्यास ती पदे वगळून उर्वरित मनुष्यबळ संख्येच्या प्रमाणांत सेवा बाह्य यंत्रणेकडून घेण्यात याव्यात. अधिसंख्य पदे जशी निरसित होतील, त्या प्रमाणे आवश्यकतेनुसार बाह्य यंत्रणेव्दारे सेवा घेण्यात याव्यात.

आ) या शासन निर्णयाच्या सोबतच्या परिशिष्टांमध्ये नमूद जे संवर्ग निरसित ठरविण्यात आले आहेत. अशा संवर्गात जितके कर्मचारी कार्यरत असतील तितकी पदे अधिसंख्य ठरविण्यात येत आहेत. अधिसंख्य ठरविलेल्या पदावरील व्यक्तीच्या सेवा निवृत्ती/राजीनामा/मृत्यू इत्यादी कारणांमुळे ते रिक्त झाल्या नंतर ते अधिसंख्य पद आपोआप रद्द होईल.

इ) बाह्य यंत्रणेव्दारे सेवा घेतांना, वित्त विभागाच्या संदर्भीय क्र.७ येथील दिनांक २७/०४/२०२२ चा व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

५. हा शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या सन २०२२ मधील ५ व्या बैठकीचे दिनांक १३/१२/२०२२ रोजीचे इतिवृत्तानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.अनौप-१५६/आपुक,दि.२४/४/२०२३ ब्दारे दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०६३०१४५६३७२२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

( कैलास गायकवाड )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई

सर्व सन्माननीय संसद, विधानसभा, विधान परिषद सदस्य यांचे खाजगी सचिव.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, गृह (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (सेवा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ.
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर पोलीस महासंचालक महाराष्ट्र, प्रशिक्षण व खास पथके, राज्य, मुंबई.
पोलीस उप महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर,
पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण/वर्धा/चंद्रपूर/भंडारा.
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
महालेखापाल-१/२ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
संबधित सर्व अधिदान व लेखा अधिकारी.
संबधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सह सचिव (पोल ३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (पोल-३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/आ.पु.क.
सर्व सबंधित कक्ष अधिकारी/अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती, पोल-३

"परिशिष्ट - ब"

घटकाचे नाव:- पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे कार्यालय.

अ) एकूण नियमित पदे

| अ.क्र. | सध्याचे पदनाम | दि. ३०.०९.२०२१ पर्यंतची मंजूर पदे | वेतनसंरचना | आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| A) | पोलीस अधिकारी व अमंलदार यांची पदे | | | |
| १ | पोलीस अधीक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| २ | अपर पोलीस अधीक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| ३ | पोलीस उप अधीक्षक | ८ | S-२० : ५६१००-१७७५०० | ८ |
| ४ | पोलीस निरीक्षक | २६ | S-१८ : ४९१००-१५५८०० | २६ |
| ५ | राखीव पोलीस निरीक्षक | १ | S-१८ : ४९१००-१५५८०० | १ |
| | एकूण गट - अ (वर्ग-१) | ३७ | | ३७ |
| ६ | सहायक पोलीस निरीक्षक | ५२ | S-१५ : ४१८००-१३२३०० | ५२ |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | ८३ | S-१४ : ३८६००-१२२८०० | ८३ |
| ८ | राखीव पोलीस उप निरीक्षक | २ | S-१४ : ३८६००-१२२८०० | २ |
| ९ | पोलीस उप निरीक्षक श्वान पथक | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| | एकूण गट - ब (वर्ग-२) | १३८ | | १३८ |
| १० | सहायक पोलीस उप निरीक्षक | २३६ | S-१० : २९२००-९२३०० | २३६ |
| ११ | पोलीस हवालदार | ६६९ | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | ६६९ |
| १२ | पोलीस नाईक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.७५०/- | ० |
| १३ | पोलीस शिपाई | १,१६५ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | १,१६५ |
| १४ | पोलीस शिपाई चालक | ८० | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ८० |
| | एकूण गट - क (वर्ग-३) | २,१५० | | २,१५० |
| B) | प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे | | | |
| १५ | वैद्यकिय अधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| | एकूण गट - अ (वर्ग-१) | १ | | १ |
| १६ | कार्यालय अधीक्षक | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | सहायक लेखाधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| ~~१८~~ | ~~उच्च श्रेणी लघुलेखक~~ | ~~१~~ | ~~S-१६ : ४४९००-१४२४००~~ | ~~१~~ |
| १९ | स्थापत्य कनिष्ठ अभियंता | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| एकूण गट - ब (वर्ग-२) | | ४ | | ४ |
| २० | प्रमुख लिपीक | ३ | S-१३ : ३५४००-११२४०० | ३ |
| २१ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | १८ | S-८ : २५५००-८११०० | १८ |
| २२ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ४० | S-६ : १९९००-६३२०० | ४० |
| २३ | मीश्रक /औषधनिर्माता | १ | S-१० : २९२००-९२३०० | १ |
| २४ | परिचारीका | १ | S-१३ : ३५४००-११२४०० | १ |
| एकूण गट - क (वर्ग-३) | | ६३ | | ६३ |
| २५ | प्रमुख आचारी | २ | S-५ : १८०००-५६९०० | १८००० |
| २६ | सहायक आचारी | २ | S-३ : १६६००-५२४०० | ० |
| २७ | भोजनसेवक | २ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| २८ | दप्तरी | १ | S-३ : १६६००-५२४०० | १६००० |
| २९ | कार्यालयीन नाईक | १ | S-३ : १६६००-५२४०० | १६०००० |
| ३० | बॉय सर्वंट | १ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| ३१ | सफाई कामगार | ५ | S-१ : १५०००-४७६०० | १५०००० |
| ३२ | कार्यालयीन शिपाई | १० | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| ३३ | कक्षसेवक | १ | S-१ : १५०००-४७६०० | १५०००० |
| ३४ | वृणोपचारक | १ | S-५ : १८०००-५६९०० | १८०००० |
| एकूण गट - ड (वर्ग-४) | | २६ | | ० |
| एकूण गट अ ते ड मधील पदे | | २,४१९ | | २,३९३ |

ब) बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या सेवा

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|
| १ | प्रमुख आचारी | २ |
| २ | सहायक आचारी | २ |
| ३ | भोजनसेवक | २ |
| ४ | दप्तरी | १ |
| ५ | कार्यालयीन नाईक | १ |
| ६ | बॉय सर्वंट | १ |
| ७ | सफाई कामगार | ५ |
| ८ | कार्यालयीन शिपाई | १० |
| ९ | कक्षसेवक | १ |

| | | |
|---|---|---|
| १० | वृणोपचारक | १ |
| | बाह्य यंत्रणेचे एकूण मनुष्यबळ | २६ |

*****